**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४**

क्र.कोविमं/माध्य.गोप./ 378
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- १४.०६.२०२१

*निकाल प्राधान्य/तातडीचे*

प्रति,
मुख्याध्यापक
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय :- माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य मंडळाकडे/वितरण केंद्रावर जमा करण्याबाबत...**

**संदर्भ :-**
१. **शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०५२१/प्र.क्र.४३/एसडी-२, दिनांक २८.०५.२०२१**
२. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य परीक्षा/३३७ दि. ०१.०६.२०२१.**
३. **या कार्यालयाचे क्र.कोविमं/माध्य गोप/३७१ दि. १०.०६.२०२१.**

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा २०२०-२१ साठी माध्यमिक शाळांनी तयार केलेले निकाल व संबंधित साहित्य मंडळाकडे जमा करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरचा तयार केलेला निकाल व संबंधित साहित्याचे पाकीट करतांना पाकीटामध्ये परिशिष्ट १ - १ ते १०, परिशिष्ट २ - १ ते २ परिशिष्ट ३ - १ ते ९ , परिशिष्ट ४ व आर १ ते ५ तसेच पी १ ते पी ४ ही परिशिष्टे विदयार्थी वर्गवारीनुसार पाकीटामध्ये घालून पाकीट सिलबंद करावे व पाकीटावर आपल्या शाळेचा सांकेतांक लिहावा. सिलबंद पाकीटावर निकाल समिती अध्यक्ष (मुख्याध्यापक ) तसेच समिती सचिव यांनी स्वाक्षरी करावी. सदर साहित्य जमा करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये अंशत: बदल करण्यात आला असून निकाल व संबंधित साहित्य मंडळाकडे न जमा करता सध्या अस्तित्वात असलेल्या वितरण केंद्रांवर दि. **२५.०६.२०२१ ते ३०.०६.२०२१** या कालावधीमध्ये जमा करावयाचे आहे. संबंधित वितरण केंद्रानी जमा झालेले सर्व साहित्य दि.**०१.०७.२०२१** रोजी मंडळ कार्यालयाकडे न चुकता हस्तपोच जमा करण्यात यावे.

**(कोल्हापूर शहर, करवीर, गगनबावडा, पन्हाळा, शाहुवाडी व कागल या तालुक्यातील शाळांनी सर्व साहित्य मंडळ कार्यालयात जमा करावे.)**

साहित्य जमा करीत असताना कोविड १९ च्या सामाजिक अंतर, मास्क, सॅनिटाइजर चा वापर इत्यादी सुचनांचे काटेकोर पालन करुन गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. निर्धारीत कालावधीत साहित्य जमा न झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित शाळा प्रमुखांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**सर्व वितरण केंद्रांना कळविण्यात येते की, साहित्य स्विकारण्याबाबतच्या सुचना स्वतंत्रपणे देण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank